# 'प्रसिध्दी पत्रक'

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**शुक्रवार, दि.१३/०९/२०१९**

## "उस्मानाबाद पोलीस दलात प्रत्येक शनिवारी 'तक्रार अर्ज निवारण दिन"

**पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद:** उस्मानाबाद जिल्हा पोलीस दलातील सर्व पोलीस ठाण्यात प्रत्येक शनिवारी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत तक्रार अर्ज निवारण दिन साजरा केला जातो. या दिवशी पोलीस मुख्यालयातील वरीष्ठ पोलीस अधिकारी प्रत्येक पोलीस ठाण्यास भेट देवुन तक्रारदारांच्या समस्यांचे निराकरण करतात. तरी तक्रारदारांनी व विरोधकांनी ज्या पोलीस ठाण्यात संबंधीत तक्रार अर्ज केले गेले आहेत. त्या पोलीस ठाण्यात योग्य त्या कागदपत्रे पुराव्यांसह हजर राहुन आपल्या तक्रार अर्जाचे निरसन करुन घ्यावे. असे आवाहन पोलीस अधीक्षक मा. श्री. राज तिलक रौशन यांनी केले आहे.

## "साखर कारखान्यातील चोरीचा मालासह आरोपीस पकडले."

**स्थानिक गुन्हे शाखा, उस्मानाबाद :** दि. ०१.०९.२०१९ रोजी २१.०० ते दि. ०२.०९.२०१९ रोजी ०६.१५ वा. दरम्यान तुळजाभावानी साखर कारखाना, नळदुर्ग येथील स्टोअर बिल्डींगच्या शटरचे लॉक तोडून आतमधील तांबा-पितळ धातुचे तिन बार (अंदाजे एकत्रीत वजन २०० किलो ग्रॅम, किं.अं. ३६,०००/-रु.) व तांबे-पितळ धातुच्या पंधरा नळया (किं.अं. ६,०००/- रु.) असा एकुण ४२,०००/- रु. किंमतीचा माल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला होता. त्यावरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दि. ०३.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला होता.

नमुद गुन्हा तपासात पोलीस अधीक्षक मा.श्री. राज तिलक रौशन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे, शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री.माने यांच्या पथकास (पोलीस हवालदार जगताप, थोरात, पोलीस नाईक चव्हाण, आरसेवाड, पोलीस कॉन्स्टेबल सर्जे, चालक कवडे) दि. १२.०९.२०१९ रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या महितीवरुन पथकाने १) दादा उध्दव चव्हाण २) आबा अप्पा शिंदे दोघे रा. ढोकी यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता सदरची चोरी ३) सुरेश उध्दव चव्हाण ४) विलास उध्दव चव्हाण ५) रमेश उध्दव चव्हाण ६) देविदास वसंत पवार उर्फ दिव्या ७) नाना नश्या शिंदे ८) बलु लाला काळे सर्व रा. ढोकी ९) लाला नवनाथ शिंदे रा. मोहा १०) माणिक बनशी काळे रा. बनसारोळा यांच्या साथीने केली असल्याचे सांगितले.

त्यांच्या कब्जात साखर कारखान्यामधील तांब्याच्या धातुचे पाईप व वॉल्व किं.अं. २०,०००/-रु. व गुन्हा करण्यासाठी वापरलेली ट्रक क्र. एम.एच. १२ एफ.सी. ७३२७, पिकअप वाहन क्र. एम.एच. २५ ए.जे. ०२११ दोन्ही वाहन एकुण किं.अं. १४,००,०००/-रु. असा एकुण किं.अं. १४,२०,०००/-रु. चा माल मिळुन आल्याने दादा उध्दव चव्हाण, आबा अप्पा शिंदे यांना पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे हजर केले आहे.



### “मद्यधुंद अवस्थेत भरधाव वेगात ट्रक चालवणाऱ्यावर कारवाई.”

**<u>पोलीस ठाणे, उमरगा:</u>** संदिप रामलिंग पुजारी रा. चिंचोली जहॉगिर, ता. उमरगा हे दि. १२.०९.२०१९ रोजी २१.३० वा.सु. आरोग्य नगरी, टी.पॉईंट येथे मद्यधुंद अवस्थेत ट्रक क्र. एम.एच. २५ ए.जे. १९३४ ही भरधाव वेगात चालवत असतांना पोलीस ठाणे, उमरगा यांच्या पथकास आढळुन आले. त्यांची वैद्यकिय तपासणी केली असता ते मद्यार्काच्या अंमलाखाली असल्याचे निष्पन्न झाले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे मो.वा.का. कलम १८५ प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ नोंदवण्यात आला आहे.

### “अवैध मद्य विक्री विरुध्द ३ कारवाया”

**<u>पोलीस ठाणे, तामलवाडी :</u>** दि. १२.०९.२०१९ रोजी ११.३० वा.सु. संतोष दादाराव जाधव रा. काटी हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने देशी दारुच्या बाटल्या किं.अं. ६,४७४/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, तामलवाडी यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, तामलवाडी येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १२.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, तुळजापूर:</u>** दि. १२.०९.२०१९ रोजी १८.१५ वा.सु. राहुल दिलीप यादव रा. हडको, तुळजापूर हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने तुळजापूर येथे विदेशी दारुच्या बाटल्या किं.अं. ४,१४०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, तुळजापूर यांच्या पथकास आढळुन आले.

यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १२.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** दि. १२.०९.२०१९ रोजी १८.४५ वा.सु. आप्पा दिगंबर कांबळे रा. तुळजापूर हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने तुळजापूर येथे देशी दारुच्या बाटल्या किं.अं. २,०८०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, तुळजापूर यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १२.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**"कळंब: मोटारसायकल चोरी."**

**पोलीस ठाणे, कळंब :** लक्ष्मण चंद्रकांत माळकर रा. हिंगणगाव, ता. कळंब यांनी साठे चौक, कळंब येथे लावलेली हिरो होंडा मोटारसायकल क्र. एम.एच. २५ व्ही. ३४९२ (किं.अं. १५,०००/-रु.) ही दिनांक ०९.०९.२०१९ रोजी १७.३० ते १८.०० वा.चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. अशा मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"उमरगा: चोरीचा प्रयत्न फसला."**

**पोलीस ठाणे, उमरगा :** दि. १२.०९.२०१९ रोजी ००.३० वा.सु. एका अल्पवयीन (विधीसंघर्षग्रस्त) मुलाने चोरीच्या उद्देशाने मनोज भिमराव सोनटक्के रा. उमरगा यांच्या टपरीचे शटर उचकटुन आत जाण्याचा प्रयत्न करीत असतांना दुकान मालकास मिळुन आला. अशा मजकुराच्या मनोज सोनटक्के यांच्या फिर्यादीवरुन वरील विधीसंघर्षग्रस्त मुलाविरुध्द (नाव-गाव गोपनीय) पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम ४६१, ३८०, ५११ प्रमाणे गुन्हा दि. १२.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"मोटारसायकलची पादचाऱ्यास धडक."**

**पोलीस ठाणे, तुळजापूर :** दि. ११.०९.२०१९ रोजी १८.०० वा.सु. भवानी रोड, सुवर्णेश्वर गणपती मंदीरासमोरील रोडवर, तुळजापूर येथे चंद्रकांत उर्फ सायबा नवगिरे रा.वेताळ नगर, तुळजापूर यांनी मोटारसायकल निष्काळजीपणे चालवुन शंकर जगन्नाथ काळे रा. वासुदेव गल्ली, तुळजापूर यांना पाठीमागुन धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या शंकर काळे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दि. १३.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"भरधाव कार हॉटेलमध्ये घुसली ६ जण जखमी."**

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) :** दि. ११.०९.२०१९ रोजी ११.३० ते १२.०० वा.सु. फॉक्स वॅगन जेट्टा कार क्र. एम.एच. १४ ए.एच. ३८८४ च्या चालकाने कार निष्काळजीपणे चालवल्याने उतमी कायापुर फाटा येथे कार रस्त्याच्या खाली जाउन पिंटु दिनु राठोड रा. दिपकनगर तांडा, तुळजापूर यांच्या पत्र्याच्या हॉटेलमध्ये घुसली त्यामध्ये पिंटु राठोड यांच्यासह हॉटेलमध्ये बसलेले गणेश सरजाराम गर्जे, गणेश तुकाराम बोंदर, प्रदिप वैजीनाथ बोंदर, देविदास पतु राठोड, विठ्ठल शंकर राठोड हे जखमी झाले तसेच हॉटेलमधील सामानाचे

नुकसान झाले. अशा मजकुराच्या पिंटु राठोड यांनी वैद्यकिय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.) वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ४२७ सह मो.वा.का. कलम १३४ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा दि. १२.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: १२ कारवाया.”**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. १२/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार १२ कारवाया केल्या असुन त्यातुन २,४०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**(विनोद ज. चौधरी)**
सहा.पोलीस निरीक्षक
जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद